आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२३ डिसेंबर २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र भरण्याची प्रक्रिया सुरु

- स्थानिक पातळीवर वेगवेगळ्या पर्यायांची निवड करत राजकीय पक्षांचे जुळवाजुळवीचे प्रयत्न

- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी वाल्मिक कराडसह सर्व आरोपींवर आरोप निश्चित

**आणि**

- मुंबई विमानतळावर ४८ कोटी रुपये किमतीचे अंमली पदार्थ जप्त

**<><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र भरण्याची प्रक्रिया आजपासून सुरु झाली. याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड… व्हीसी-(५० सेकंद)**

*(या निवडणुकीसाठी ३० डिसेंबरपर्यंत अर्ज स्वीकारले जातील आणि ३१ डिसेंबरला अर्जांची छाननी होईल. २ जानेवारी २०२६ पर्यंत उमेदवारांना माघार घेता येईल. ३ जानेवारीला निवडणूक चिह्नांचं वाटप होईल आणि अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध होईल. आवश्यकतेनुसार १५ जानेवारीला मतदान होणार असून १६ जानेवारीला मतमोजणी होईल. १९ जानेवारीला निवडणूक निकाल शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केल्यानंतर निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईल.*

*या निवडणुकीसाठी महायुती आणि महाविकास आघाडीच्या घटक पक्षांची समीकरणं अद्याप जाहीर झालेली नाहीत.*

*मुंबईत काँग्रेसनं सर्व जागा स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना या दोन्ही पक्षांनी एकत्र लढायचं ठरवलं असलं तरी अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. ती उद्या होईल असं शिवसेना*

*उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ज्येष्ठ नेते संजय राऊत यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे. यावेळी आम आदमी पक्षानं रिंगणात प्रवेश केला असून ४० उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे.)*

**<><><><><>**

पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत शरद पवार आणि अजित पवार यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्रितरित्या निवडणूक लढवू शकतात, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी आज मुंबईत वार्ताहरांशी बोलताना दिली

**…. होल्ड- बाईट- शशिकांत शिंदे**

येत्या शुक्रवारपर्यंत या आघाडीची घोषणा होऊ शकते, असं अजित पवार यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत सांगितल्याची माहिती सूत्रांनी दिली. या आघाडीत काँग्रेसही सोबत असू शकते. यासंदर्भात अजित पवार यांचा फोन आला होता, अंतिम निर्णय प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि इतर नेत्यांशी चर्चा घेऊन होईल, असं आमदार सतेज पाटील म्हणाले.

**<><><><><>**

ठाणे महानगरपालिका निवडणुकीसाठी महायुतीतले मित्रपक्ष जागावाटपाच्या चर्चेपासून आपल्याला दूर ठेवत असल्यानं, स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा पर्याय आपण खुला ठेवला आहे, असं राष्ट्रवादी काँग्रेसनं आज स्पष्ट केलं. शिवसेना आणि भाजपानं चर्चेसाठी बोलावलं तरच आम्ही किती जागांची अपेक्षा आहे, ते सांगू, असं राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते आनंद परांजपे यांनी सांगितलं. भाजपा आणि शिवसेनेच्या स्थानिक नेत्यांनी जागावाटपाची चर्चा सुरु केली असून त्यांच्या बैठकांमधे आम्हाला बोलावलं जात नाही. त्यामुळे आम्ही स्वतंत्रपणे लढण्याची तयारी सुरु केली आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

इंटेलिजन्स ब्यूरो - आय बी म्हणजे भारतीय गुप्तवार्ता विभाग देशातल्या नागरिकांची सुरक्षा आणि राष्ट्राची एकता आणि अखंडता सुनिश्चित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. भारतीय गुप्तवार्ता विभागाच्या नवी दिल्लीत झालेल्या ३८ व्या शताब्दी स्मृती व्याख्यानात त्या बोलत होत्या.

यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, गृहराज्यमंत्री बंडी संजय कुमार आणि गृहसचिव गोविंद मोहन उपस्थित होते.

<><><><><>

अमेरिकेचा अत्याधुनिक दूरसंचार उपग्रह अंतराळात घेऊन जाणारा एलव्हीएम थ्री-एम ६ अग्निबाणाचं उड्डाण उद्या होणार असून यासाठीच्या उलट गणतीला सुरुवात झाल्याची माहिती इस्रोनं आज दिली. श्रीहरिकोटा इथल्या तळावरुन ब्लूबर्ड ब्लॉक- २ हे अंतराळयान घेऊन हा प्रक्षेपक उद्या सकाळी ८ वाजून ५४ मिनिटांनी उड्डाण करेल. अमेरिकेचा हा उपग्रह ६ टनांपेक्षा जास्त वजनाचा असून अशा प्रकारच्या प्रक्षेपकाद्वारे आतापर्यंत सोडण्यात आलेला सगळ्यात वजनदार उपग्रह असल्याची माहिती इस्रोनं दिली आहे.

<><><><><>

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी वाल्मिक कराड आणि त्यांच्या सहकाऱ्यांविरोधात आज आरोप निश्चित झाले. वाल्मिक कराड आणि त्यांच्या साथीदारांनी ही हत्या केल्याचं आरोपपत्रात नमूद आहे, असं विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम म्हणाले. कारागृहात असलेल्या आरोपींना हे आरोप वाचून दाखवण्यात आले. त्यांनी हे सर्व आरोप फेटाळल्याची माहिती निकम यांनी दिली.

<><><><><>

शेतकरी नेते आणि माजी प्राधनमंत्री दिवंगत चौधरी चरणसिंह यांच्या जयंतीनिमित्त आज राष्ट्रीय शेतकरी दिवस साजरा केला जात आहे. त्यानिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रम होत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी चरणसिंह यांना जयंतीनिमित्त श्रद्धांजली वाहिली आहे. चौधरी चरण सिंह यांनी समाजातील वंचित घटकांच्या कल्याणासाठी तसेच शेतीच्या प्रगतीसाठी आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी आपले जीवन समर्पित केलं, असं मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

विकसित भारत जी रामजी योजनेसाठी एक लाख ५१ हजार कोटी रुपये तरतूद केली असल्याची माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी आज दिली. चौहान यांनी एका व्हिडिओ संदेशात सांगितलंय की, आता १०० दिवसांऐवजी सव्वाशे दिवसांच्या

रोजगाराची हमी ग्रामीण भागत सरकारने दिली आहे. जीरामजी योजनेत काम उपलब्ध न झाल्यास बेरोजगारी भत्त्याचीही तरतूद आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं.

**होल्ड- शिवराज सिंग चौहान**

मनरेगा या पूर्वीच्या योजनेच्या नावाखाली नवीन योजनेची जाणीवपूर्वक बदनामी केली जात असल्याचं ते म्हणाले.

<><><><>

माजी प्रधानमंत्री पी.व्ही. नरसिंह राव यांची आज पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी  आदरांजली वाहिली आहे.

<><><><>

देशात यावर्षी आतापर्यंत ५ कोटी  ८० लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर रब्बी पिकांची पेरणी झाली आहे. गेल्या वर्षी याच कालावधी झालेल्या पेरण्यांच्या तुलनेत हे क्षेत्र  सुमारे आठ लाख हेक्टरने जास्त आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं १९ डिसेंबरपर्यंतच्या रब्बी पिकांखालील क्षेत्राच्या प्रगतीचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. गव्हाचं क्षेत्र ३०१ लाख हेक्टरपेक्षा जास्त आहे. कडधान्याची पेरणी १२६ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर झाली असल्याचं सरकारी आकडेवारीत म्हटलं आहे.

<><><><>

सीमाशुल्क विभागाने मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर ४८ कोटी रुपये किमतीचे  अंमली पदार्थ  जप्त केले आहेत.  १८ ते २२ डिसेंबर दरम्यान केलेल्या कारवाईत सीमाशुल्क विभागाच्या पथकाने बँकॉकहून आलेल्या आठ प्रवाशांकडून ४८ किलोपेक्षा जास्त हायड्रोपोनिक वीड हा अंमली पदार्थ  जप्त केला. मस्कतहून आलेल्या एका प्रवाशाकडून १६ लाख रुपये पेक्षा जास्त किमतीचं ८१ ग्रॅम ॲम्फेटामाइन जप्त करण्यात आलं. तसंच या कारवाईदरम्यान ३५ लाख रुपयांपेक्षा  पेक्षा जास्त  किमतीचे २८३ ग्रॅम वजनाचे हिऱ्यांचे दागिने आणि २४ लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीचे साडे सहा किलो पॉलिश केलेले मौल्यवान खडे देखील जप्त करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे २२ डिसेंबरला फुजैराहला जाणाऱ्या  प्रवाशांकडून ४५ लाख रुपयांपेक्षा जास्त  किमतीचं  परदेशी चलन देखील  जप्त करण्यात आलं आहे.

//<><><><><>//